Indian Institute of Technology, Roorkee यांचेकडील 'Environmental Management of Rivers and Lakes' या पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेण्यास इच्छुक असणा-या अभियंत्यांकडून अर्ज मागविणेबाबत...

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**सामान्य प्रशासन विभाग**
**परिपत्रक क्र.साप्रवि/११/कावि/१०५/२०२४**
४था मजला, मुख्य प्रशासकीय इमारत,
जुना मुंबई-पुणे महामार्ग, पिंपरी – ४११०१८.
तारीख : २६ जुलै, २०२४

परिपत्रक,

Indian Institute of Technology, Roorkee यांनी पत्र क्र.HRED/U-40/563, दि.१५ एप्रिल २०२४ अन्वये Environmental Management of Rivers and Lakes या पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ५ इच्छुक अधिका-यांची नावे कळविणेबाबत विनंती केलेली आहे.

राज्य/केंद्र सरकारच्या संस्थामध्ये काम करणारे अधिकारी / अभियंता / शास्त्रज्ञांना Environmental Management of Rivers and Lakes या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक सत्र २०२४-२५ साठी प्रायोजित ५ उमेदवारांकरीता प्रवेश खुला आहे. सदर उमेदवारांना जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत संस्थेची फी, वसतिगृह खोलीचे शुल्क, पुस्तक सहाय्य, मासिक भत्ता (२ वर्षे कालावधीकरीता) अदा केले जाणार आहे. अभ्यासक्रमाचे माहितीपुस्तक https://Lnkd.in/g2cKsKrr या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर अभ्यासक्रम विशेषत: पर्यावरणाशी संबंधित क्षेत्रातील समस्यांसाठी मुलभूत तत्त्वे, आकृती, विश्लेषण आण उपाययोजनांच्या अंमलबजावणीमध्ये सखोल ज्ञान प्रदान करण्यासाठी तयार करण्यात आलेले आहे. नद्या आणि तलवांच्या संदर्भात जलस्त्रोतांचे व्यवस्थापन, नद्या आणि तलावांचे पर्यावरण व्यवस्थापन या विषयातील पदव्युत्तर पदवी असलेले उमेदवार शहरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक आरोग्य विभाग, राज्य पाटबंधारे विभाग, नगरपालिका संस्था, पाणलोट, प्रदूषण नियंत्रण मंडळे, सरोवर विकास प्राधिकरणे यांसारख्या केंद्र आणि राज्य संस्थांच्या आकांक्षा पूर्ण करतील अशी रचना या अभ्यासक्रमात करण्यात आलेली आहे.

पात्र विद्यार्थी शासनामार्फत राबविलेल्या विविध उपलक्रमांना प्रेरित करू शकतात,जसे की, नॅशनल मिशन फॉर क्लिन गंगा, राष्ट्रीय नदी संवर्धन योजना यांसारख्या राष्ट्रीय योजना, नॅशनल प्लॅन फॉर कन्झर्वेशन ऑफ एक्वाटिक सिस्टिम, अटल मिशन फॉर रिजर्वेशन आणि शहरी परिवर्तन, जलशक्ती मंत्रालय, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, शहरी विकास मंत्रालयाने हाती घेतलेले घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छ भारत आणि उन्नत भारत अभियान इ. आणि इतर राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत येणारे कार्यक्रम.

Indian Institute of Technology, Roorkee यांचेकडील Environmental Management of Rivers and Lakes या पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील इच्छुक अभियंता यांनी आपले अर्ज विभागप्रमुखांच्या शिफारशीसह दिनांक ०६/०८/२०२४ अखेर सामान्य प्रशासन विभागास सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

**प्रत – सर्व संबंधित विभाग** ------------------------

२/- सदरचे परिपत्रक आपले विभागातील सर्व संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देऊन त्याची पोहोच प्रशासन विभागास सादर करावी.